प्रेसनोट दि.२७/११/२०१७

**लग्नाचे अमिष दाखवून फसवणुक करणारे नागपूरचे पती पत्नी जोडपे यांना नागपूर येथून सायबर क्राईम सेल पुणे शहर पोलीसांनी केली अटक......**

सिंहगडरोड येथे रहात असलेला पिडित युवक, वय-३१ वर्षे, व्यवसाय-आयटी इंजिनिअर हयाचा घटस्फोट झाल्यानें त्यांने पुर्नविवाहासाठी ब्राम्हण, देशस्थ, डायव्होसी मेट्रोमोनीवर नाव नोंदविले होते. तेव्हा पल्लवी असलकर नावाचे मुलीने पिडीत युवकास मोबाईल क्र. ९६७३१६६४२० व्दारे संपर्क साधला, दोघांचे एकमेंकांशी फोन, व्हॉटसॲप चॅटींग चालू झाले होते. तिने पिडीत व्यक्तीस ती रायगढ, झारखंड येथे पीडब्लूडी मध्ये नोकरीस आहे व वडील सिव्हील कन्ट्रक्शनचा व्यवसाय आहे असे सांगून पिडीताचा विश्वास संपादन केला होता. आरोपी पल्लवी हिने तिचे वडीलांना हार्ट ॲटॅक आलेला असून तिला पैशांची गरज आहे असे सांगून पिडीत युवकाकाडे पैशांची मागणी केली व वेगवेगळया तारखांना व वेळोवेळी एकुण रु.२,१५,०००/- युनियन बॅक ऑफ इंडिया खातेमध्ये भरली. त्यानंतर आरोपीने पिडितास वडिलांचे निधन झाले आहे असे फोनव्दारे कळविले. व आरोपीने फोन बंद ठेवला, बरेच दिवसांनी पिडिताने आरोपीस फोन लावण्याचा प्रयत्न केला असता फोन लागला नाही व बोलण्यास टाळाटाळ केली. पिडिताने रायगढ छत्तीसगड येथे जाऊन चौकशी केली असता तेथे सदर नावाची व्यक्ती कार्यरत नाही असे सांगण्यात आल्याने व पिडीतास संशय आला आल्याने त्याची एकुण रु.२,१५,०००/- फसवणुक झाली आहे याची खात्री झाल्याने पिडीताने सायबर क्राईम सेलकडे तक्रार दिली. त्यावरुन सिंहगड पोलीस स्टेशन गु.र.नं.३६९/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सांगवी येथे राहत असलेला पिडीत युवक वय-३२ वर्षे याने शादी डॉट कॉमवर त्याचे नाव विवाहासाठी नोंदविले होते. तेव्हा त्यास वरीलप्रकारच्या पध्दतीनेच रु.२,००,०००/- रक्कमेस फसविले होते. त्यामध्ये मुलीचे नाव काव्या असलकर रा.राजस्थान मोबाईल क्र. ८८०६८९५८१६ असे वापरण्यात आले होते. त्यावरुन सांगवी पोलीस स्टेशन गु.र.नं.४६९/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२० आयटी ॲक्ट ६६डी, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर क्राईम सेलकडुन सदर गुन्ह्याचा समांतर तपास करण्यात येत असताना आरोपीने आणखी ७ ते ८ तरुण मुलांची फसवणुक करुन २० लाखांपर्यंत फसवणुक केली असावी असे दिसून येत होते. त्याचप्रमाणे वरील दोन्ही गुन्हयातील हकिगत सारखी असून महिला आरोपीचे नावामध्ये साम्य असल्याचे दिसून आले. तेव्हा आरोपी यांनी वापरलेल्या वेगवेगळया मो.क्र.९६७३१६६४२० व मो.क्र.८८०६८९५८१६ विश्लेषन करण्यात आले. त्यामध्ये आणखी काही मोबाईल नंबर मिळून आले. त्याआधारे आरोपी नागपूर येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने गजानन पवार पोलीस निरीक्षक सायबर क्राईम सेल, यांच्या नेतृत्वाखाली सपोनि स्वप्नाली शिंदे व स्टाफ यांनी नागपूर येथे जाऊन बाबत आरोपीचा शोध घेतला असता ते विदयानगर, वाठोडी, नागपूर येथे असल्याबाबत माहिती मिळाली. तेथे गेल्यावर किशोर चुडामन रामटेककर वय-३४ वर्षे असा मिळून आल्यावर त्याला गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने "त्याची पत्नी रिंकी उर्फ कामिनी किशोर रामटेककर वय-२८ वर्षे हिचे सोबत मिळून लग्नाचे अमिष दाखवून अनेक तरुण मुलांकडून फसवणुक लाखो रुपये घेतलेले आहेत, पत्नीचे काव्या असलकर व पल्लवी असलकर या नावाने मेट्रोमोनी साईटवर नाव नोंदवून ठेवले होते. तरुण मुलांचे लग्नाबाबत फोन आल्यावर पत्नी रिंकी उर्फ कामिनी त्यांचेशी मोबाईलव्दारे बोलत, चॅटींग करित त्यानंतर आमच्या प्लॅन प्रमाणे नंतर त्या मुलास भावनिक गुंतवुन तिचे वडिलांचे औषधोपचारास पैसे पाहीजे असे सांगून त्यांचेकडून लाखो रुपये घेत व त्यानंतर वडिल वारले आहे असे सांगून ती बोलायचे परिस्थितीत नाही, असे मी वडिल किंवा मामा भासवून सांगायचो" याबाबत कबुली दिली.

त्यानंतर आरोपी किशोर चुडामन रामटेककर व त्याची पत्नी रिंकी उर्फ कामिनी किशोर रामटेककर यांचेकडून गुन्हयात वापरलेले ०४ मोबाईल, युनियन बँकेचे पासबुक व एटीएम कार्ड तसेच फेक आधारकार्ड, इलेक्शन कार्ड, डेबिट कार्ड व पेनड्राईव्ह, इतर कागदपत्रे जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजानन पवार, सपोनि स्वप्नाली शिंदे, पो.हवा. अस्लम आत्तार, पो हवा सरिता वेताळ, पो.शि. कु-हे, पो.शि.शेलार, म.पो.शि.दिवाने यांनी केली.

याव्दारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अनेक तरुण मुले-मुली लग्नासाठी अनेक मेट्रोमोनी साईटवर त्यांचे नाव नोंदवितात. त्यांना मेट्रोमोनी साईटवरिल प्रोफाईलवरुन लग्नाची मागणी आल्यावर त्यामध्ये सुंदर फोटो व चांगल्या नोकरीचे अमिष दाखविले जाते व लग्नाबाबत मोबाईलवर बोलणे व चॅटींग करुन भावनिक गुंतवणुक करुन एखादी घटना घडलेली आहे असे भासवून वेगवेगळया बँक खात्यामध्ये वेगवेगळया कारणास्तव मोठया रक्कमा भरण्यास भाग पाडले जाते. अशाप्रकारची फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. मेट्रोमोनी साईटवर नाव नोंदविले असल्यास समोरिल व्यक्तीची खात्री करावी. प्रत्यक्ष भेट घेऊन व्यक्तीची शहानिशा करावी.